# छंद पुष्परचनेचा - २५

सोबत दिलेली पुष्परचना ख्रिसमससाठी किंवा वाढदिवसाला स्वत: बनवून देण्यासारखी आहे. फोटोत दिलेली गुलाबाची लाल फुले डुप्लेक्स पेपरची बनवली आहेत व त्याबरोबर खोटी पाने वापरली आहेत.



तुम्हाला स्वत: अशी रचना बनवायची असेल तर ६ इंच व्यासाच्या प्लॅस्टिक प्लेटमधे फ्लोरल स्पंजचा तुकडा मध्यभागी ठेवून तो तारेने बांधूणे. त्याच्या मध्यभागी एखादी नाजूक मेणबत्ती खोचणे व प्लॅस्टिक प्लेट व स्पंज ॲल्युमिनियम फॉईलने झाकणे. प्लेटच्या एका बाजूस फोटोत दाखवल्याप्रमाणे ३ गुलाबाची फुले खोचणे व त्याच्या बाजूने आपल्या आवडीनुसार कोणतीही पाने लावणे. डेकोरेशनसाठी रंगीत थर्माकोलचे गोळे, सॅटीन रिबीनचा वापर करता येईल.

टीप - खोटी फुले वापरल्यास फ्लोरल स्पंज कोरडा ठेवावा व खरी फुले वापरल्यास फ्लोरल स्पंज ओला करुन मग ॲल्युमिनियम फॉईलने झाकावा.

सौ. अरुंधती शिरीष देशपांडे
इकेनोबो इकेबाना, पुणे चॅप्टर
asdssd@gmail.com